हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

औरंगाबाद महामॅरेथॉनमुळे मोबाइल, टीव्हीच्या जगात गर्क असणाऱ्या नव्या पिढीला बाहेर पडण्याची, नवे काहीतरी करण्याची प्रेरणा मिळेल. यानिमित्ताने शहरवासीयांना फिटनेस सुधारण्याची संधी मिळेल. 'लोकमत'च्या पुढाकाराने औरंगाबादप्रमाणेच इतर शहरांमध्येही महामॅरेथॉन सुरु व्हावेत. या उपक्रमामुळे फिटनेसबाबत जागृती निर्माण झाल्यामुळे भविष्यात अनेकांच्या तब्येतीच्या तक्रारीही दूर होतील, असा विश्वास वाटतो. - माधुरी निमजे

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

धूत ह्युंदाई ग्रुप... (डावीकडून) मनोज जाधव, शेख फुझेल, धीरज मंत्री, प्रसन्ना पांडव, अतिक खान, अरुण पोपळघट, रवींद्र फुलेलवाड, रोहित पाटणकर, विकास वाळ्वेकर (जनरल मॅनेजर सेल्स), अभिजित कान्हेरे, सय्यद असिफअली, राहुल ताजणे, प्रशांत पाटील, अखिल खान, प्रसाद बांगड.

सकल मारवाडी युवा मंच... आशिष मेहता, मधुर अग्रवाल, गिरीश अग्रवाल, नितीन भक्कड, आशिष अग्रवाल (अध्यक्ष), अमित भोमा (सचिव), संजय मंत्री, नरेश मोर, जगदीश उपाध्याय.

जायंटस् ग्रुप ऑफ औरंगाबाद प्राइड... (डावीकडून) नीलेश गुंडवार, अभय शहा (सचिव), निखिल सारडा, संतोष धानुका, राजेश वैष्णव, प्रवीण सोमाणी (अध्यक्ष), नंदकिशोर मालपाणी, हुजेफा अमिन.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

विद्यापीठ निवडणूक : १० जागांसाठी ५५ उमेदवारांमध्ये चुरस

पदवीधर; आज मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेच्या पदवीधर गटासाठी सोमवारी (दि.६) मतदान होत आहे. यात खुल्या गटात ५ आणि राखीव प्रवर्गातील ५, अशा एकूण १० जागांसाठी मतदान होत आहे. चार जिल्ह्यांत मिळून २९ हजार ५०० पदवीधारक मतदानासाठी पात्र ठरले आहेत.

विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यामध्ये अधिसभेच्या चार गटांसाठी २४ नोव्हेंबर रोजी मतदान झाले होते. दुसऱ्या टप्प्यात पदवीधर गटासाठी सोमवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होत आहे. या गटात मतदारांची संख्या अधिक असल्यामुळे चार जिल्ह्यांत एकूण ५६ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी १२५ प्राध्यापक आणि ७८ शिक्षकेतर कर्मचारी तैनात केल्याची माहिती कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे यांनी दिली. मागील टप्प्यात झालेला गोंधळ टाळण्यासाठी यावेळी कोणतीही कसर सोडली नाही. मतपत्रिकांचा कलरही वेगवेगळा ठेवण्यात आल्यामुळे कोणत्याही प्रकारचा गडबड, गोंधळ होणार नसल्याचा दावाही कुलगुरुंनी केला.

या निवडणुकीत आमदार सतीश चव्हाण गटाचे उत्कर्ष पॅनल, 'अभाविप'चा विद्यापीठ विकास मंच, विविध विद्यार्थी संघटनांच्या नेत्यांची परिवर्तन आघाडी, मराठवाडा संघर्ष समितीने विद्यापीठ बचाव पॅनल आणि युवा सेना व भाविसेतर्फे शिवशाही पॅनल उभे केले आहे. याशिवाय डॉ. उल्हास उढाण, शिवाजी लकडे, प्रशांत पवार, डॉ. बाबासाहेब भालेराव आदी अपक्ष उमेदवारांची यादीही मोठी लांबलचक आहे. उत्कर्ष पॅनलमध्ये खुल्या प्रवर्गात डॉ. नरेंद्र काळे, डॉ. भारत खैरनार, प्रा. संभाजी भोसले, राखीव प्रवर्गात प्रा. सुनील मगरे, सुभाष राऊत, सुनील निकम, संजय काळबांडे, शीतल माने यांच्या नावांचा बोलबाला आहे. तर विद्यापीठ विकास मंचमध्ये मनोज शेवाळे, सलीम जहागीर, चत्रभुज गोडबोले, राखीव प्रवर्गात पंकज भारसाखळे, योगीता तौर आदींच्या विजयासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तर विद्यार्थी नेत्यांच्या परिवर्तन आघाडीत राहुल तायडे, प्रकाश इंगळे, शिवशाहीत तुकाराम सराफ, विद्यापीठ बचावमध्ये ॲड. शिरीष कांबळे यांच्यासह अपक्षांमध्ये डॉ. उल्हास उढाण यांनी विजय मिळविण्यासाठी जोर लावला आहे.

मंचचे निमंत्रक डॉ. गजानन सानप यांनी पदवीधरमध्ये सर्वाधिक उमेदवार निवडून येणार असल्याचा दावा केला आहे. तर उत्कर्षचे उमेदवार डॉ.भारत खैरनार यांनी मागील टप्प्यात मंचला मिळालेला एक आकडी विजयसुद्धा पदवीधरमध्ये मिळणार नसून, सर्वच्या सर्व जागी उत्कर्षचे उमेदवार विजयी होणार असल्याचे सांगितले.

विद्यापीठाच्या अधिसभेतील पदवीधर गटातील १० जागांसाठी सोमवारी ५६ मतदान केंद्रांवर मतदान होत आहे. यासाठी मतपेट्या घेऊन जाण्याच्या गडबडीत असलेले अधिकारी.

०५ जागा खुल्या गटात
०५ जागा राखीव प्रवर्गात
०४ जिल्हे
२९,००० मतदार
८ ते ५ वेळेत होणार मतदान

सिडकोची मिनी ट्रेन शहरात पळविण्याचा घाट

महापालिका : ३० लाख रुपये खर्च करून ट्रेन धूळखात उभी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सिडको-हडकोतील बच्चेकंपनीलाही मिनी ट्रेनचा आनंद घेता यावा या उद्देशाने तीन वर्षांपूर्वी सिडको एन-८ भागातील बॉटनिकल गार्डनमध्ये तब्बल ३० लाख रुपये खर्च करून अद्ययावत मिनी ट्रेन आणण्यात आली. या ट्रेनचे दोन वेळेस ट्रायलही घेण्यात आले. मिनी ट्रेन चालविण्यासाठी महापालिकेकडे नियमित ड्रायव्हर नाही, एवढे एकमेव निमित्त दाखवून दोन वर्षांपासून ट्रेन धूळखात पडली आहे. आता ही ट्रेन सिद्धार्थ उद्यानात नेऊन तेथील जुनी व अत्यंत छोटी मिनी ट्रेन सिडकोला देण्याच्या हालचाली तीव्र झाल्या आहेत.

सिडको-हडकोची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. या भागात नागरिकांच्या सोयीसाठी चांगले उद्यान नाही. बच्चेकंपनीच्या विरंगुळ्यासाठी कोणतेही साधन नाही. ही बाब लक्षात घेऊन तत्कालीन मंत्री राजेंद्र दर्डा यांनी सिडको एन-८ येथील बॉटनिकल गार्डनमध्ये मिनी ट्रेन उभारण्याचा निर्णय घेतला. ३० लाख रुपयांचा निधीही महापालिकेला शासनाकडून आणून देण्यात आला.

महापालिकेने निविदा काढून हे काम करून घेतले. मिनी ट्रेन उभारणाऱ्या खास कारागिरांना आणि कंत्राटदाराला हे काम देण्यात आले. एक वर्षाच्या अथक परिश्रमानंतर बॉटनिकल गार्डनमध्ये मिनी ट्रेनसाठी स्वतंत्र रेल्वे ट्रॅक, प्लेटफार्म, तिकीट खिडकी आदी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

ज्या भागातून ही मिनी ट्रेन चालते त्या परिसराला चारही बाजूने जाळीची सुरक्षा देण्यात आली. महापालिका मिनी ट्रेन सुरु करण्यात अजिबात स्वारस्य दाखविण्यास तयार नाही. अनेक दिवस तर ट्रेनची ट्रायलच घेण्यात आली, उद्घाटन कसे करणार, असे कारण दाखविण्यात आले.

एकदा नव्हे तर दोनदा ट्रायलही घेण्यात आले. त्यानंतर ट्रेन चालविण्यासाठी प्रशिक्षित चालक नाही, असे सांगण्यात येऊ लागले.

काही दिवस तिकिटासाठी दर निश्चिती आणि तिकीट छपाई सुरु असल्याचेही निमित्त पुढे करण्यात आले. आता चक्क ही ट्रेन उचलून सिद्धार्थ उद्यानात बसवायची आणि तेथील जुनी आणि अत्यंत छोटी ट्रेन आणून येथे ठेवण्याचा घाट रचण्यात येत आहे.

सिडको-हडकोला सापत्न वागणूक

- सिडको-हडकोचे मनपात हस्तांतरण झाल्यापासून आजपर्यंत या भागावर अन्यायच करण्यात आलेला आहे. शिवसेना-भाजप युतीला या भागातून सर्वाधिक नगरसेवक मिळतात.
- सिडको-हडकोच्या पाठिंब्यावर युतीची सत्ता मनपात येते. असे असतानाही या भागाला पुरसा निधी मिळत नाही. आता सिडको-हडकोच्या बच्चेकंपनीची मिनी ट्रेनही शहरात पळवून नेण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत.

बोरामणीकरचे यश

औरंगाबाद : पुणे येथे झालेल्या ११ वर्षांखालील राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत औरंगाबादची खेळाडू तनिषा बोरामणीकरने कांस्यपदक पटकावले. या कामगिरीमुळे तिची दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. एशियन युथ चॅम्पियनशिप थायलंड आणि जागतिक युथ बुद्धिबळ स्पर्धा स्पेन येथे होईल. नगरसेविका शिल्पाराणी वाडकर, सागर वाडकर यांनी तिचा सत्कार केला.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

घोटाळ्याची पाळेमुळे खोदणे सुरु

कालबाह्य औषधी : अनेक रुग्णालयांना औषधी कागदावर वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या पाणचक्की, निजाम बंगला येथील भांडार विभागात कोट्यवधी रुपयांची औषधी कालबाह्य झाल्याचे प्रकरण 'लोकमत'ने २१ नोव्हेंबर रोजी उघडकीस आणले. या प्रकरणात आरोग्य उपसंचालक कार्यालयाने चौकशी समिती गठित केली असून, समितीने काजकाजाला सुरुवात केली आहे. घोटाळ्याची पाळेमुळे खोदून काढण्यास समितीने सुरुवात केल्याने आरोग्य विभागात एकच खळबळ उडाली आहे. जिल्ह्यातील काही रुग्णालयांना फक्त कागदावर औषधी वाटप केल्याची खळबळजनक बाब समोर येत आहे.

लेखा कोषागार कार्यालयात भांडार पडताळणी पथक असून, या पथकाने १९ नोव्हेंबर रोजी अचानक जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील पाणचक्की व निजाम बंगला येथील भांडाराची पडताळणी केली. या पाहणीत तब्बल दीड कोटी रुपयांची औषधी कालबाह्य झाल्याचे समोर आले. पडताळणी पथकाने या औषधांची कागदपत्रे, खरेदी आदींची माहिती मागितली असता संबंधित अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. काही कर्मचाऱ्यांनी तर भांडार विभागाचा कारभारच आपल्याकडे नसल्याचे सांगून हात वर करून टाकले. ज्यांचा भांडार विभागाशी अजिबात संबंध नाही, त्यांची नावे समोर करण्यात आली. भांडार विभागाचा हा सावळागोंधळ पाहून पडताळणी पथकाने या घोटाळ्याचा सविस्तर अहवाल १ नोव्हेंबर रोजी आरोग्य उपसंचालक कार्यालय आणि आरोग्य विभाग, मुंबई यांच्याकडे पाठवून दिला.

२१ नोव्हेंबर रोजी 'लोकमत'ने सर्वप्रथम या घोटाळ्यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्याची दखल दुसऱ्या दिवशी पालकमंत्री रामदास कदम यांनीही जिल्हाधिकारी कार्यालयात एका बैठकीत घेतली. या घोटाळ्याशी संबंधित सविस्तर कागदपत्रे सादर करा, असे आदेशही त्यांनी दिले. आरोग्य उपसंचालक कार्यालय प्रथम 'अगा जे घडलेच नाही...' असा आव आणत होते. नंतर या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. समितीने २३ नोव्हेंबरपासून कामकाजला सुरुवात केली आहे.

सर्व काही गोलमाल

- चौकशी समितीने जिल्हाचिकित्सक कार्यालयातील भांडार विभागाची सखोल माहिती घेण्यास सुरुवात करताच अनेक विदारक सत्ये समोर येऊ लागली. जिल्ह्यातील काही रुग्णालयांना, महापालिकांना औषधी देण्यात आल्याचे रेकॉर्ड प्राप्त झाले. खरोखरच औषधी वाटप केली का? याची शहानिशा सुरु झाली. अनेक रुग्णालयांना औषधीच मिळालेली नाही. रेकॉर्डवर औषधी दिल्याचे नमूद आहे. ज्या बॅच नंबरची औषधी वाटप केल्याचे दाखविले आहे, ती औषधी न देता काहींना दुसऱ्याच बॅचची दिली आहे.

राजीव सातव यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : काँग्रेस पक्षाचे उमेदवार इंद्रनील राजगुरु हे गुजरातचे मुख्यमंत्री यांच्या विरोधात राजकोट, गुजरात येथून निवडणूक लढवीत आहेत. काल कुठलेही कारण न देता पोलिसांनी त्यांना अटक केली. याचा जाब विचारण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसचे सचिव, गुजरातचे प्रभारी व खा.राजीव सातव पोलीस स्टेशनवर गेले असता तेथील पोलिसांनी त्यांना धक्काबुक्की केली. त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले.

या पोलीस कृत्याचा निषेध करीत असल्याचे काँग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी जितेंद्र देहाडे यांनी कळविले आहे. त्या हल्ल्यात सहभागी असलेल्या पोलिसांची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

रेल्वेत जागेवरून प्रवाशांमध्ये वाद

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : रेल्वेस्टेशनवर रविवारी दुपारी तपोवन एक्स्प्रेसमध्ये जागेवरून प्रवाशांमध्ये चांगलाच वाद झाला. या वादामुळे प्रवाशाने दोन ते तीन वेळा चेन ओढून रेल्वे थांबविली. त्यामुळे रेल्वेस्टेशनवर काही वेळेसाठी गोंधळ निर्माण झाला. ही बाब लक्षात येताच रेल्वे सुरक्षा बल आणि लोहमार्ग पोलिसांनी धाव घेतली. प्रवाशांना सक्त सूचना दिल्यानंतर ही रेल्वे रवाना झाली.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

#MahaMarathon /MahaMarathon लोकमत
Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION
१७ डिसेंबर २०१७
विभागीय क्रीडा संकुल, सूतगिरणी चौक, गारखेडा, औरंगाबाद
नावनोंदणी www.mahamarathon.com/aurangabad वर ऑनलाईन करु शकता किंवा
मॅरेथॉनची प्रवेशिका लोकमत भवन, जालना रोड येथे उपलब्ध । संपर्क : 9921030700, 9130239424 । फोन : 0240-3021708
लोकमत महामॅरेथॉन
औरंगाबाद 17/12/2017 | कोल्हापूर 28/01/2018 | नागपूर 11/02/2018 | नाशिक 07/10/2018
T-Shirt Partner SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors
In Association with WOCKHARDT LIFE WINS
Food & Beverage Partner Frut-X
Official Energy Drink Partner Enerzal
Sporting Accommodation Partner istay sporty
Health & Drink Partner Vedika Care n Cure
Outdoor Partner abhishek
Healthcare Partner VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL
Race Management YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner RELAX - ZEAL
Water Partner COOLZY
Banking Partners Bank of Baroda AURANGABAD REGION, Bank of India
Sound Partner S.S.PRO
Mall Partner PROZONE
Sports Partners